**शालिमार (बीओआय) सहकारी गृहरचना संस्था मर्यादित.**
**पत्ता:-स.नं ४७७/बी,पर्वती,शिवदर्शन,पुणे.४११ ००९.**
**नोंदणी क्र.:- पीएन्ए/एच्एसजी/६२५/दि.:-०७/०८/१९७०**

---

दिनांक:-१९/०३/२०२४

<u>पुनर्विकसन व्यवस्थापक समिती सभेचा वृत्तांत</u>

शालिमार (बीओय) सहकारी गृहरचना संस्थेची पुनर्विकसन व्यवस्थापक समितीची सभा रविवार दिनांक १७/०३/२०२४ रोजी सायंकाळी ६.०० वाजता संस्थेच्या आवारामध्ये आयोजित करण्यात आली होती. सदर सभेसाठी संस्थेचे सन्माननीय सभासद उपस्थित होते. सभेमध्ये खालीलप्रमाणे विषयवार चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले त्याचा सविस्तर वृत्तांत विषय व ठराव यास्वरूपात खालीलप्रमाणे ठरविण्यात आला.

<u>सभेपुढील विषय</u>

**विषय क्र.:-१.** पुनर्विकसन निविदा ओपन करून निर्णय घेणे.

पुनर्विकसन समिती सभेमध्ये चर्चा होवुन निविदा/टेंडर नमुना मंजुर करण्यात आला. संस्थेने दि.१० फेब्रुवारी २०२४ ते दि.२४ फेब्रुवारी २०२४ पर्यंत निविदा मागवाव्या आणि १६ मार्च २०२४ पर्यंत विकसकांनी निविदा भरून संस्थेकडे जमा कराव्या असे आवाहन करण्यात आले. हया संबंधात २० विकसकांनी निविदा अर्ज नेले, आणि १२ विकसकांनी निविदा भरून दिल्या. दि.१७ मार्च २०२४ रोजीच्या पुनर्विकसन व्यवस्थापक समिती सभेमध्ये बंद निविदा संस्थेच्या व्यवस्थापक समिती मध्ये ओपन करून त्या निविदेवर संस्थेचा गोल शिक्का आणि उपस्थित असलेल्या१८ सभासदांनी सहया केल्या.

**शालिमार (बीओआय) सहकारी गृहरचना संस्था मर्यादित.**
**पत्ता:-स.नं ४७७/बी,पर्वती,शिवदर्शन,पुणे.४११ ००९.**
**नोंदणी क्र.:- पीएन्ए/एच्एसजी/६२५/दि.:-०७/०८/१९७०**

---

१२ निविदादारांनी आपल्याकडे निविदा भरुन दिला त्याचा तुलनात्मक  तक्त्याची प्रत संस्थेकडे देण्यात आलेली आहे. वरीलप्रमाणे सर्व माहिती पुर्नविकास समितीच्या सभासदांसमोर मांडण्यात आली. त्यास पुर्नविकास समितीने मान्यता दिली.

शालिमार (बीओय)सहकारी गृहरचना संस्थेच्या वतीने,

**अध्यक्ष** **सचिव** **खजिनदार**